**बिगर सिंचनासाठी पाणी पुरवठा (पिण्यासाठी, औद्योगिक, औष्णिक विद्युत केंद्रे व अन्य सिंचनेतर संस्थांना वापरासाठी पाणी पुरवठा) करणेबाबत**

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-१००१/(१५४/०१)/सिं.व्य.(धो.)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी, २००३

**शासन निर्णय**

राज्यातील पिण्याच्या पाण्याची गरज तसेच औद्योगिक व अन्य सिंचनेतर संस्थांचे वापरासाठी सिंचन प्रकल्पातून पाणी पुरवठ्याचे धोरण शासनाने स्विकारलेले आहे व त्यानुसार उक्त कारणांसाठी पाणी पुरवठयाचे मान्यतेबाबत शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णय, परिपत्रके, पत्र व ज्ञापनाव्दारे क्षेत्रिय आधिकारी यांना सूचना व आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सोबतच्या **प्रपत्र 'अ'** मध्ये दर्शविलेले असे शासन निर्णय, ज्ञापन, परिपत्रके व पत्र ह्या आदेशान्वये अधिक्रमित करून शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**१.० पाणी पुरवठ्याचा प्राधान्यक्रम**

पाटबंधारे प्रकल्पातून पाणी पुरवठ्याचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१) घरगुती पाणी वापर
२) औद्योगिक कारणासाठी पाणी वापर
३) सिंचनासाठी पाणी वापर

तथापि अग्रक्रम विशिष्ट परिस्थितीनुसार संबंधित पाणीसाठयाच्या संदर्भात गुणानुक्रमे बदलू शकतो.

**२.० पाणी वापराच्या सर्वसाधारण अटी**

२.१ पाणी वापरासाठी पाटबंधारे विभागाने एकदा मंजूरी दिल्यानंतर व त्या वापरासाठी मंजूर दराप्रमाणे पाणीपट्टीची आकारणी केल्यानंतर त्या पाण्याचा वापर शक्यतो मंजूरी दिलेल्या कारणासाठीच केला पाहिजे. मात्र ठराविक कारणासाठी मंजूरी दिलेल्या पाणीपुरवठ्याच्या निरनिराळया कारणासाठी करावयाचा झाल्यास पाणीपट्टीचे दर निरनिराळेच असल्याकारणाने त्या त्या पाण्याचा वापर मोजण्यासाठी ग्राहकांनी निरनिराळी पाणीमापक यंत्रे बसविली पाहिजेत. अशा पाण्याचा हिशोब वेगवेगळा ठेवला पाहिजे. निरनिराळे पाणीमापक यंत्रे बसविण्याची व्यवस्था वापरदाराकडून करण्यात आली नाही तर संबंधित पाण्याच्या वापरापैकी ज्या कारणासाठी पाणीपट्टीचा मंजूर दर जास्त असेल त्या दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी.

२.२ ज्या कारणासाठी पाणी घेण्यास मंजूरी देण्यात आली असेल त्या कारणासाठी पाण्याचा वापर झाल्यावर ते पाणी मूळ ठिकाणी परत करण्यात येवो अगर न येवो त्यावर पाणीपट्टीच्या मंजूर दराप्रमाणे पूर्ण आकारणी घेण्यात यावी. तसेच हे पाणी फिरवून पुन्हा पुन्हा वापरल्यास त्यावर पाटबंधारे विभागाने पुन्हा निराळी पाणीपट्टी आकारु नये. त्या पाण्याचा इतर कोणत्याही योग्य कारणासाठी उपयोग केल्यास या विभागाची हरकत नाही.

२.३ वर नमूद केलेली अट साखर कारखान्याच्या कंडेन्सरकरिता पाणी पुरवठ्यासाठी जी मंजूरी देण्यात येते त्यासही लागू राहील.

२.४ कारखान्यांनी एकदा वापरलेले पाणी फिरवून पुन्हा पुन्हा वापरु शकतात. जर वापरलेले पाणी मूळ ठिकाणी परत सोडावयाचे ठरविल्यास त्याबाबत त्यांनी महाराष्ट्र जल प्रदूषण प्रतिबंधक कायदा १९६९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही केली पाहिजे व त्यासाठी ते कारखाने महाराष्ट्र जल प्रदुषण नियंत्रण मंडळास परस्पर जबाबदार राहतील. तसेच शासन परिपत्रक क्र. बिपापु १००१/(७१३/२००१)/सिंव्य(धो), दि. १८.९.२००२ च्या बिगर सिंचन करारनामा मसुद्यानुसार कारवाईस पात्र राहतील.

२.५ आधिसूचित नद्या, नाले अगर कालवे यामधून औद्योगिक व पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांसाठी घेतलेल्या पाण्याचा ते पाणी फिरवून पुन्हा पुन्हा कोणत्याही योग्य कारणांसाठी उपयोग करण्यास पाटबंधारे विभागाची हरकत नाही. मात्र ज्यावेळी अशा पाण्याचा उपयोग ऊस पिकासाठी करण्यात येईल त्यावेळी ऊस पिकाच्या क्षेत्रावर शासन वेळोवेळी जी कमाल मर्यादा घालतील त्या मर्यादेतच ऊस पिके करावी लागतील. कालव्यावरील उपसा सिंचन योजनांना ऊसासारख्या बारमाही पिकास मंजूरी देऊ नये. कालव्यावरील उपसा योजनांना वरील सवलत लागू नाही.

२.६ स्पेंटवॉशवर विहीत पध्दतीप्रमाणे प्रक्रिया केल्यानंतर त्याची तीव्रता कमी करण्यासाठी त्यामध्ये प्रक्रिया केलेल्या स्पेंटवॉशच्या फक्त १० पट गोडे पाणी मिसळण्यासाठी पाटबंधारे विभागाने प्रचलित नियमाप्रमाणे मंजूरी द्यावी. त्यासाठी स्थानिक अधिका-यांकडे त्या मागण्या येतील त्यास मंजूरी देण्याच्या दृष्टीने आसवणी (Distillery) मधून बाहेर पडणाऱ्या स्पेंटवॉशची माहिती घेऊन व वरीलप्रमाणे विचारात घेऊन मंजूर करावयाच्या पाण्याचा हिशोब करावा व या हिशोबाप्रमाणे किंवा प्रत्यक्ष मागणी केलेले पाणी यात जे कमी पाणी असेल त्याप्रमाणे मंजूरी देण्यासाठी सर्व तपशीलासह शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावेत.

२.७ प्रक्रिया केलेल्या स्पेंटवॉशची तीव्रता कमी करण्यासाठी कालव्याच्या असमादेश भागातील उपसा सिंचन योजनांवर मंजूरी दिलेल्या स्पेंटवॉश मिश्रित पाण्यावर खाली नमूद केलेल्या प्रमाणात पिके करण्यास मंजूरी द्यावी. मात्र या प्रमाणे जे पाणी उपसाने स्पेंटवॉश करीता मंजुर केले असेल त्यापैकी फक्त ५० टक्के पाणी महाराष्ट्र जल प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहीत केलेल्या पध्दतीने स्पेंटवॉशवर प्रक्रिया केल्यानंतर त्यामध्ये कालव्याचे पाणी मिश्र करून खाली निर्देश केलेल्या टक्केवारीप्रमाणे ऊसासाठी वापरण्यास मंजूरी देण्यास हरकत नाही. तथापि स्पेंटवॉशमिश्रित पाण्यात कार्बनी घटक असल्याने ते ऊस पिकासाठी वापरल्यास जमीन खराब होण्याची शक्यता आहे. तेव्हा स्पेंटवॉश मिश्रित पाणी वापरातून सुरुवातीची दोन वर्षे एकूण सिंचन क्षेत्राच्या ४ टक्क्यापेक्षा जास्त क्षेत्रावर ऊस पिके घेण्यास मंजूरी देऊ नये. या दोन वर्षाचा अनुभव लक्षात घेऊन दुष्परिणाम आढळून आले नाहीत तर पुढील २ वर्षाकरिता ही मर्यादा ८ टक्क्यापर्यत वाढवावी व पाचव्या वर्षापासून १० टक्क्यापर्यंत ऊस पिकास मंजूरी देण्याची मर्यादा वाढवावी. वरीलप्रमाणे ऊस पिके करण्यास मंजूरी दिल्यानंतर त्या मंजुरीपेक्षा जास्त क्षेत्रावर ऊस पिके केल्यास त्यावर प्रचलित नियमानुसार दंडाचे दराने आकारणी करावी. तसेच स्पेंटवॉशमिश्रित पाण्यावर ऊस पिके केल्यामुळे जमिनी खराब होऊ नयेत म्हणून संबंधित कारखाने/संस्था यांनी स्वखर्चाने सुरुवातीपासूनच चर योजना वगैरे उपाय योजना करणे आवश्यक असून अशी उपाय योजना केली नसल्याचे आढळून आल्यास ऊस पिके करण्यास दिलेली मंजूरी रद्द करण्यात येईल अशी अट परवानगी देताना घालावी.

## ३.० कालव्यातून पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांसाठी मंजूरी

राज्यातील जलसंपत्तीच्या उपयोगाच्या संदर्भात पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी शासनाने अग्रक्रम दिला आहे. तथापि पाणी पुरवठयाचे आराखडे तयार करतांना कालवा हे पाणी पुरवठयाचे साधन (source) म्हणून न स्विकारता कालवा बंद कालावधीत पाणी पुरवठयासाठी पर्यायी योजनेची व्यवस्था करणे अपरिहार्य होते म्हणून अशा योजनेसाठी कालवा हे पाणी पुरवठयाचे साधन म्हणून न स्विकारता थेट जलाशयातूनच पाणी उचलणे योग्य होईल. परंतु पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांसाठी कालव्याशिवाय पाणी पुरवठयाचे इतर कोणतेही साधन (source) उपलब्ध नसल्यास अशा योजनांसाठी कालव्यातून पाणी घेण्यास संबंधित स्थानिक संस्था उदा. नगरपालिका, ग्रामपंचायती वगैरेंना पाणी पुरवठयासाठी मंजूरी देण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) प्रकल्पाच्या पाणी नियोजन हिशोबात न धरलेल्या नव्या पाणी पुरवठा योजनांमुळे सिंचन प्रकल्पांसाठी मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पिय सिंचन क्षेत्रात १० टक्क्याहून अधिक कपात होऊ नये.

२) पिण्याच्या किंवा औद्योगिक पाणी पुरवठा योजनेच्या आराखडयात पुढे वाढणा-या गरजा लक्षात घेऊन उदभवानुसार

अ) बारमाही कालवा उदभव असेल तर २ महिने पाणी पुरेल एवढा साठवण तलाव बांधणे आवश्यक राहील.

ब) आठमाही कालवा उदभव असेल तर ५ महिने पाणी पुरेल एवढा साठवण तलाव बांधणे आवश्यक राहील.

क) नदी / कालवा अपरिहार्य उदभव असेल तर ज्या नदीत सिंचनासाठी बारमाही पाणी सोडले जाते त्या नदीवरील पिण्याच्या पाणी पुरवठा योजनेसाठी १ महिन्याच्या गरजेएवढी साठवण क्षमता व इतर नद्यांबाबत मात्र ४ महिन्यांच्या गरजेएवढी साठवण क्षमता असणारा साठवण तलाव बांधणे आवश्यक राहील.

३.१ जी गांवे धरणाच्या जलाशयापासून १० कि.मी. अंतराच्या आत असतील अशासाठी पाणी साठवण्याची तरतूद ७ दिवसांच्या पाणीसाठ्यापर्यंत कमी ठेवली तरी चालू शकेल.

३.२ कालव्यातील पाण्याचा दर्जा किंवा त्या पाण्याच्या दूषितपणास पाटबंधारे विभागास जबाबदार धरता येणार नाही.

३.३ कालव्यातून पाणी घेण्यासाठी करावयाच्या अंतरग्रहण बांधकामाच्या (इन्टेक वर्क्स) तपशीलवार नकाशास पाटबंधारे खात्याच्या संबांधित अधीक्षक अभियंता यांच्याकडून मंजूरी घेतली पाहिजे.

३.४ पाटबंधारे खात्याच्या ताब्यातील कालव्याच्या जमिनीमध्ये किंवा कालव्यापासून कमीत कमी ३५ मीटर लांबपर्यंतची कामे ही पाटबंधारे खात्याकडूनच डिपॉझिट पध्दतीने (डिपॉझिट कॉन्ट्रिब्युशन) जरूर ते पैसे खात्याकडे प्रथम भरून करून घेतली पाहिजे.

३.५ पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु करण्यापूर्वी कालव्यातून व्हावयाच्या पाणी पुरवठ्यासाठी संबांधित कालव्याचे नियंत्रण असलेल्या पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याबरोबर विहित नमुन्यात करारनामा केला पाहिजे. कालव्यासंबंधीची काही दुरुस्तीची किंवा इतर कामे जरुरीची वाटल्यामुळे कालवा काही वेळा बंद ठेवावा लागतो. म्हणून वरील एक महिना साठवणीची तरतूद सुचविली आहे व सर्वसाधारणपणे ती पूरी व्हावी अशी अपेक्षा आहे. परंतु काही अनपेक्षित कारणाने कालवा यापेक्षाही जास्त काळ बंद ठेवावयास लागला

(१० कि.मी. अंतरावरील गावांच्या बाबतीत ७ दिवस मुदतीच्यावर) तर पर्यायी पाणी पुरवठा व्यवस्था संबांधित पाणी पुरवठा करणाऱ्या संघटनेने/खात्याने त्यांच्या खर्चाने करावी. असे करारनाम्यामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

## ४.० पिण्याच्या पाण्याची मंजूरी

४.१ जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची गरज नगण्य अशी असल्यामुळे पिण्याच्या पाणी पुरवठयामध्ये जनावरांच्या पाण्याचा गरजेचा स्वतंत्र उल्लेख करण्यात येत नाही.

४.२ महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सा:रण मंडळाने शहर व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांची पाण्याची गरज भागविण्याच्या दृष्टीने पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांसाठी लागणाऱ्या पाण्याची गरज पाटबंधारे खात्याच्या संबंधित विभागांना विनाविलंब कळवावी म्हणजे त्याप्रमाणे निरनिराळया नदी खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या तयार करण्यात येत असलेल्या बृहत आराखडयात त्यासाठी पाटबंधारे विभागास तरतूद करता येईल.

४.३ पाटबंधारे प्रकल्पाचा बृहत आराखडा व पिण्याच्या पाण्यासाठी केलेला बृहत आराखडा याची सांगड परस्पर विचाराने केली जावी. त्याचप्रमाणे पाटबंधारे प्रकल्पाचे तलाव व कालवे यांचे तपशिलही कामे सुरु करण्याच्या वेळी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सा:रण मंडळास कळविण्यात यावेत.

४.४ पिण्याचा पाणी पुरवठ्याच्या योजनांचे परिसर अभियांत्रिकी विभागाने आराखडे तयार करताना कालवा हा पाणी पुरवठ्याचे साधन म्हणून न स्विकारता थेट तलावातून पाणी उचलावे. तथापि कालव्याशिवाय पाणी पुरवठयाचे इतर कोणतेही साधन उपलब्ध नसल्यास आवश्यक ती साठवण क्षमता पाणी पुरवठा जलनिस्सा:रण मंडळाने निर्माण केल्यास (बारमाही कालव्यासाठी एक महिन्याच्या गरजेएवढी क्षमता व आठमाही कालव्यासाठी पाच महिन्याच्या गरजेएवढी क्षमता) कालव्यातून पाणी घेण्यास इतर अटी घालून मंजूरी देण्यात येईल. तथापि नळ पाणी पुरवठा योजनेची आखणी करतानाच पाण्याच्या उपलब्धतेविषयी पाटबंधारे विभागाकडे विचारणा केल्याशिवाय व पूर्ण संमती घेतल्याशिवाय पाणी पुरवठा योजनेचे आराखडे व अंदाजपत्रके महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाच्या संबधित प्रशासकीय विभागाकडे पाठवू नयेत.

४.५ कार्यान्वित असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाचे धरण/कालवा याखेरीज अन्य पर्यायी उद्‌भव नाही अशी पाटबंधारे खात्याची खात्री पटल्यास नव्या पाणीपुरवठा योजनांची गरज भागविण्यासाठी प्रकल्प मंजूर करण्यात आलेल्या सिंचन क्षेत्रात कपात करण्याची १० टक्के मर्यादा सर्वसाधारणपणे पुरेशी आहे. तसेच दुष्काळी परिस्थितीत पिण्यासाठी पाणी प्राधान्याने राखून ठेवून उरलेल्या साठ्यातून जी कपात लावणे अपरिहार्य होते ती कपात सिंचन तसेच औद्योगिक पाणी पुरवठा या दोन्हीस लावण्यात येईल. त्याशिवाय गरज पडल्यास औद्योगिक पाणी पुरवठ्यातून कपात लावली जाईल.

४.६ राज्यात अपुरा पाऊस पडून अर्वषणासारखी परिस्थिती उद्‌भवल्यास पाटबंधारे प्रकल्पाच्या जलाशयातून पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी राखून ठेवलेले पाणी जनावरांसाठी व लोकांच्या पिण्याकरिता नदीत सोडावे अशा तऱ्हेच्या मागण्या शासनाकडे वारंवार येतात. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी जलाशयातून पाणी उचलावे. तथापि जिथे धरणातून थोडया अंतरावरील नदीकाठच्या गावासाठी जलाशयातून नदीत पाणी सोडणे अगदीच अपरिहार्य असेल तेथे नदीकाठच्या प्रदेशातून शेतीसाठी अनधिकृतपणे पाण्याचा उपसा होऊन (विशेषत: ऊसासारख्या नगदी व जादा पाणी घेणाऱ्या पिकासाठी) पाणी नाश होणार नाही यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी कठोर उपाय योजावेत.

४.७ अवर्षणसदृश्य परिस्थितीमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी पाटबंधारे प्रकल्पाच्या धरणात राखीव साठा ठेवावयाचा झाल्यास त्याचे आगाऊ पैसे संबंधित अभियांत्रिकी मंडळ अथवा जिल्हा परिषद, नगर परिषद इ. यांनी पाटबंधारे विभागाकडे भरावेत.

४.८ अधिसूचित नदीनाल्यामधून पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी ग्रामपंचायती, नगरपालिका, महाराष्ट्र जलनिस्सारण मंडळ अथवा औद्योगिक वापरासाठी शासनाची अंगीकृत असलेली महामंडळे तसेच काही खाजगी संस्था/कारखाने परवाना मागतात. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, असा परवाना मिळाल्यावर या संस्था नदीतून किंवा नाल्यातून थेट पाणी उचलण्याची व्यवस्था करतात. अवर्षणसदृष्य परिस्थितीमुळे एखाद्या वर्षी नदीचे पाणी आटल्यास त्यांना मंजूर करण्यात आलेल्या पाण्याचा कोटा अव्याहतपणे मिळावा यासाठी ते वरच्या बाजूस असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाच्या साठयातून पाणी सोडण्याची मागणी करतात. नदीतून नदीपात्राच्या वहनक्षमतेच्या मानाने छोटे असणारे प्रवाह सोडण्याच्या या कार्यपध्दतीत पाणी नाश बराच होतो. दुष्काळी परिस्थितीत तर पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळे आणखीनच अडचण होते. यामुळे यापुढे अशा महामंडळाचा/संस्थांचा/कारखान्यांचा पाणी परवान्याबाबत अर्ज आल्यास नदीचा शाश्वत विसर्ग कोणत्या महिन्यापर्यंत उपलब्ध असतो हे विचारात घेऊन त्यासाठी स्वतंत्र साठवण क्षमता त्यात समाविष्ट केली असल्याखेरीज ते विचारात घेऊ नयेत. तसेच अशा प्रस्तावाची शासनाकडे शिफारसही करु नये. किमान ४ महिन्याचा साठा अशा योजनांमध्ये प्रस्तावित असणे आवश्यक आहे म्हणजे नदीमध्ये जानेवारी, फेब्रुवारीनंतर प्रवाह नसतांनाही पुढील पावसाळयापर्यंत पाण्याची अडचण पडणार नाही.

४.९ थोडक्यात अशा तऱ्हेच्या पाणी अर्जामध्ये उद्‌भव हा अस्तित्वातील अथवा प्रकल्पित साठयातून थेट धरण्यात आला नसेल किंवा ४ महिन्यांचा साठाही प्रस्तावित केला नसेल तर तो अर्ज विचारात घेतला जाणार नाही .

४.१० तसेच आतापर्यंतच्या अनुभवावरुन जर दुष्काळप्रसंगी काही विशिष्ट संस्था/कार्यालये अशा पाण्याची मागणी करतात असे दिसले तर त्यांनी अशा साठवण क्षमतेची तरतूद करण्याची कार्यवाही करावी. याचा पाठपुरावा आतापासूनच तो तशी साठवण क्षमता निर्माण होईपर्यंत करावा.

## ५.० <u>पाटबंधारे प्रकल्पातून पिण्यासाठी/औद्योगिक वापरासाठी पाणी पुरवठा योजनांच्या मंजूरीचे प्रस्ताव पाठविताना सादर करावयाची छाननी यादी आणि अनुसरण्यात यावयाची कार्यपध्दती</u>

५.१ बिगर सिंचन मंजूरीसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती वापरावी.

याबाबतच्या सूचना संबंधित मंत्रालयीन विभागांनी त्यांचेकडील मंडळे/महामंडळे/संस्था इत्यादींना तसेच मंडळे/महामंडळे किंवा संस्था यांनी त्यांचे कार्यकक्षेतील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना द्याव्यात.

१) बिगर सिंचनाच्या वापरासाठी शक्यतो स्वतंत्र साठा करणे आवश्यक आहे.

२) पाटबंधारे प्रकल्पातूनच बिगर सिंचनासाठी पाणी पुरवठा आवश्यक ठरल्यास प्रस्तावात पाणी उचल प्रत्यक्ष पाटबंधारे जलाशयातूनच असावी जेणेकरुन पाणी पुरवठा करताना प्रवाहात पाणीनाश होणार नाही किंवा पाण्याचा दुरुपयोग होणार नाही. पूर्ण झालेल्या प्रकल्पाऐवजी नियोजित प्रकल्पातून पाणी देणे जास्त सोयीस्कर असते, ही बाब प्रस्ताव करताना ध्यानात ठेवावी.

३) शक्यतोवर कालवा हा उदभव घेणे टाळावे, अपवादात्मक परिस्थितीत कालवा हा उद्‌भव धरणे आवश्यक असल्यास कालवा दुरुस्ती व इतर काही अपरिहार्य कारणामुळे कालवा बंद असेल त्या काळात पाणी पुरवठयासाठी

अ) बारमाही कालव्यावर २ महिने पाणी पुरेल एवढया क्षमतेचा साठवण तलाव बांधणे आवश्यक राहील.

ब) जेथे कालवा आठमाही आहे तेथे ५ महिने पुरेल एवढया क्षमतेचा साठवण तलाव बांधणे आवश्यक राहील.

४) नदी किंवा नाल्यातून पाणी पुरवठा प्रस्तावित करुच नये. परंतु दुसरा कुठलाच पर्यायी उद्‌भव नसल्यास आणि नदी हाच उद्‌भव घेणे आवश्यक असल्यास नदीत पावसाळयानंतर किती दिवस आवश्यक विसर्ग उपलब्ध असतो, हे पाहून त्याप्रमाणे किंवा कमीत कमी ४ महिने पुरेल एवढया क्षमतेचा साठवण तलाव बांधणे आवश्यक राहील.

## ५.२ कार्यपध्दती

५.२.१ पिण्याच्या पाण्यासाठीच्या प्रस्तावांची छाननी करतांना सर्वंकष माहिती उपलब्ध व्हावी या दृष्टीने शासनाच्या १६.३.९१ च्या शासन परिपत्रकासोबत जोडलेली छाननी यादी आता सुधारित करण्यात आली असून ती सोबत जोडली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून आता या सुधारित छाननी यादीप्रमाणे प्रस्ताव मागवावेत. हे प्रस्ताव मागवितांना सोबत जोडलेल्या प्रपत्र-२ मध्ये नमूद केलेली माहितीही प्राप्त होईल असे पहावे.

५.२.२ यापूर्वीच प्रलंबित प्रस्ताव आणि नवीन सर्व प्रस्ताव आता या सुधारित यादीप्रमाणे तयार करुन त्याची छाननी करावी.

५.२.३ छाननी करताना खालील गोष्टी पहाव्यात :-

१) पिण्याच्या पाण्याची मागणी एकूण ३ टप्प्यात म्हणजे इ.स. २०११, २०२१ आणि २०३१ या सालापर्यंतची देण्यात यावी. ही मागणी त्या त्या दर्जाच्या ज्या अंदाजित लोकसंख्येवर आधारित आहे त्या लोकसंख्येची आकडेवारी आणि दरडोई पाणी पुरवठयाचे प्रमाणही नमूद केलेले असावे.

२) पाण्याची कमी उपलब्धता असलेल्या मांजरा नदी खो-यात दरडोई खालीलप्रमाणे पाणी पुरवठयाचे प्रमाण धरण्याचे शासनाचे धोरण आहे, त्यामुळे मांजरा खोऱ्यातील मागण्यांची छाननी त्यानुसार करावी.

| | लोकसंख्या | दरडोई दररोज पाणीपुरवठयाचे प्रमाण (लिटरमध्ये) |
|---|---|---|
| **१)** | २० हजार पेक्षा कमी | ५५ |
| **२)** | २० हजार पेक्षा जास्त पण ६० हजारापेक्षा कमी | ७० |
| **३)** | ६० हजाराहून जास्त पण १ लाखाहून कमी | ८५ |
| **४)** | १ लाखाहून जास्त | १०० |

३) पाण्याची योजना करताना शक्यतो जलाशयातून बंद नळाव्दारे पाणी आणण्याचा प्रस्ताव केलेला असावा. तसे शक्य नसेल तर ते का शक्य नाही याची सविस्तर कारणमिमांसा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून घ्यावी.

४) सध्या मोठया व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयावरुन पाण्याचे आरक्षण करताना प्रकल्पस्थळी ७५ टक्के, ५० टक्के व ९५ टक्के विश्वासार्हतावर उपलब्ध होऊ शकणारे पाणी ठरवावे. पिण्याच्या पाण्याच्या योजना ९५ टक्के विश्वासार्हतेवर असल्याने अशा प्रकल्पांच्या बाबतीत ९५ टक्के विश्वासार्हतेच्या पाण्याची उपलब्धता किती हे प्रकल्प अधिका-यांनी तपासावे. ज्या ठिकाणी विश्वासार्हतेचे उपलब्ध पाणी हे पिण्याच्या पाण्याच्या मागणीपेक्षा कमी असेल त्या ठिकाणी पर्यायी उद्‌भव शोधावा, तो उपलब्ध होत नसेल तर तसे स्पष्ट करावे.

५) वरील सूचनांनुसार तयार केलेली छानननी यादी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी ३ प्रतीत पाटबंधारे विभागाच्या संबंधित अधीक्षक अभियंत्याकडे पाठवावी. या छाननी यादीची एक प्रत जीवन प्राधिकरणा-या अधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाच्या संबंधित कार्यकारी अभियंत्यानाही पाठवावी.

६) या याद्या प्राप्त झाल्यावर पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी या छाननी यादीवर त्यांचे अभिप्राय एक आठवडयात नोंदवून त्या संबंधित पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंत्याकडे पाठवाव्यात.

७) अशी यादी प्राप्त झाल्यावर पाटबंधारे विभागाच्या सिंचन व्यवस्थापन मंडळाच्या अधीक्षक अभियंत्यांनी समन्वय अधीक्षक अभियंता म्हणून अशा प्रस्तावाच्या क्षेत्रीय स्तरावरील छाननीसाठी आवश्यक तर विभागातील संबंधित अन्य अधीक्षक अभियंता तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता यांची छाननी यादी प्राप्त झाल्यापासून ८ दिवसांत एक बैठक घ्यावी. या बैठकीत इ.स.२०११ सालापर्यंतच्या प्रस्तावित पाणी आरक्षणाच्या मागण्यांच्या तुलनेने जलाशयात ९५ टक्के विश्वासार्हतेने उपलब्ध असणारे पाणी आणि आवश्यकतेनुसार पर्यायी उद्‌भव इत्यादींचा सर्वंकष विचार करुन विचाराधिन पाणी आरक्षणाच्या मागण्या, त्यापूर्वी मंजूर केलेले आरक्षण, विचारात घेऊन एकूण आरक्षण प्रकल्पीय सिंचन क्षेत्राच्या १० टक्के पर्यंतच्या मर्यादित असेल तर अशी मागणी मान्य करण्याचे प्रस्ताव मुख्य अभियंता यांच्याकडे पाठवावेत.

८) असे प्रस्ताव मुख्य अभियंता त्यानंतर एका आठवडयात मंजूर करुन सर्व संबंधित अधीक्षक अभियंता यांना मान्यता कळवतील.

९) जे प्रस्ताव या मर्यादेत बसत नाहीत अशा सर्व प्रस्तावाचा गोषवारा प्रपत्र-२ मध्ये दिलेल्या नमून्यामध्ये तयार करावा. हे करतांना प्रस्ताव दोन भागात असावा. पहिल्या भागात विचारार्थ असलेल्या पाणी आरक्षणाचे प्रस्ताव आणि त्यापूर्वी केलेले आरक्षण अशी एकत्रित पाण्याची मागणी पाणी साठयाच्या २५ टक्क्यापेक्षा कमी असेल असे प्रस्ताव अंतर्भूत करावेत आणि भाग- २ मध्ये त्याखेरीज अन्य सर्व प्रस्तावांचा अंतर्भाव करावा.

१०) यातील भाग-१ मधील प्रस्तावांवर शासन स्तरावरील सचिव समिती विचार करेल आणि भाग- २ मधील प्रस्ताव मंत्री स्तरावरील उपसमितीसमोर ठेवण्यात येतील.

११) पाणी पुरवठयाच्या ज्या प्रस्तावांना पाटबंधारे विभागाने यापूर्वी मान्यता दिली आहे त्या प्रस्तावाची संकलित माहिती वर नमूद केल्याप्रमाणे प्रपत्र-२ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंत्यांनी त्वरित पाटबंधारे विभागाच्या संबंधित अधीक्षक अभियंता यांचेकडे ३ प्रतीत पाठवावी. तसेच या माहितीची एक प्रत संबंधित मुख्य अभियंता यांना आणि एक प्रत शासनाला परस्पर पाठवावी, जेणेकरुन आतापर्यंत मंजूर केलेल्या आणि आता मंजूर करीत असलेल्या अशा सर्व पिण्याच्या पाणी आरक्षणाचा आणि त्यामुळे कमी होणाऱ्या सिंचनाचा तसेच अशा सिंचनाच्या पुनर्स्थापनेसाठी येणा-या खर्चाचा आढावा राज्यस्तरावर घेणे पाटबंधारे विभागाला शक्य होईल.

१२) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता आणि पाटबंधारे विभागाचे संबंधित अधीक्षक अभियंता यांच्यावर राहील.

**५.३ पाणी पुरवठा योजनांसाठी आंतर विभागीय स्थायी समितीची नियुक्ती व कामाची व्याप्ती**

पाणी पुरवठा योजनांसाठी उपलब्ध पाणीसाठा व मागणी हयाचा समन्वय साधण्यासाठी खालीलप्रमाणे सचिवांची आंतर विभागीय स्थायी समितीची नियुक्ती करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| **१)** | सचिव (पा), पाटबंधारे विभाग | अध्यक्ष |
| **२)** | सचिव (लाक्षेवि), पाटबंधारे विभाग | सदस्य |
| **३)** | सचिव, नगरविकास विभाग | सदस्य |
| **४)** | सचिव, उद्योग, उर्जा व कामगार (उद्योग) | सदस्य |
| **५)** | मुख्य आभियंता (पा) व सहसचिव | सदस्य |

५.३.१ या समितीने करावयाच्या कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे राहील.

१) नगरविकास विभागाने कार्यान्वित करावयाच्या शहर पाणी पुरवठा योजना व ग्रामविकास विभागाने कार्यान्वित करावयाच्या प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजना व गांव पाणीपुरवठा योजना यासाठी

अ) जलसंपत्तीच्या प्रस्तावित उदभवास मान्यता देणे

ब) जलसंपत्तीचे वाटप करणे

क) पाणी पुरवठा योजनांच्या बृहत आराखड्याच्या बाबतीत समन्वय साधणे व गती देणे

२) शासनाच्या कोणत्याही खात्याने कार्यान्वित करावयाच्या पाणी साठ्याच्या नवीन योजनेतील पाण्याचे निरनिराळ्या प्रयोजनासाठी वाटप ठरविणे

३) पूर्वीच बांधलेल्या पाणीसाठयाच्या योजनेतील पाणीवाटपासंबंधी प्रश्न निर्माण झाल्यास पुर्नविलोकन करुन असे प्रश्न सोडविणे तसेच पिण्याच्या पाणी पुरवठयाच्या नवीन योजनांच्या कार्यन्वयन प्रसंगी पाणी वाटपाचे संदर्भात उद्‌भवणारे प्रश्न सोडविणे

४) पाटबंधारे प्रकल्प उदभव धरून प्रस्तावित योजनांच्या बाबतीत पाटबंधारे प्रकल्पामधील उपयुक्त पाणीसाठ्याच्या १५ ते २५ टक्के पर्यंतच्या बिगर सिंचनांच्या आरक्षणाच्या मंजूरीचे अधिकार सचिवांच्या आंतरविभागीय स्थायी समितीस (सचिव समितीच्या कामाची व्याप्ती कायम ठेऊन) राहील. मात्र २५ टक्के मर्यादेपर्यंतच्या पाणी आरक्षणामुळे प्रकल्पाच्या सिंचनामध्ये जी कपात होईल व या क्षेत्राच्या पुनर्स्थापनेसाठी जो खर्च येईल त्याबाबत तपशील सचिव समितीने यथोचित आदेशासांठी शासनाच्या निदर्शनास आणावा.

५) वरील निर्णय हा भविष्यकालीन, बांधकामाधीन तसेच पूर्ण झालेल्या प्रकल्पासही लागू राहील.

**६.० महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा पाणी पुरवठा**

६.१ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेकरिता करण्यात येणारा पाणीपुरवठा पाटबंधारे विभागाच्या योजनेच्या एकूण क्षमतेच्या १५ टक्यांपेक्षा कमी असल्यास पाटबंधारे विभागाने भांडवली अंशदान न मागता पाणीपुरवठा करावा.

६.२ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेकरिता करण्यात येणारा पाणीपुरवठा पाटबंधारे विभागाच्या योजनेच्या एकूण क्षमतेच्या १५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा पाणीपुरवठा लक्षात घेऊन फक्त त्या

प्रमाणात पाटबंधारे विभागाला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भांडवली अंशदान द्यावे. म्हणजेच अशा पाणीपुरवठा योजनांतून घरगुती वापरासाठी किंवा पिण्याच्या पाण्यासाठी जो पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ करते, त्याबाबत कोणत्याही प्रकारचे भांडवली अशंदान पाटबंधारे विभागाने मागू नये.

६.३ पाटबंधारे विभागाच्या पाटबंधारे योजनेमार्फत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनांना करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्यात पिण्याच्या पाण्याच्या खालोखाल प्राधान्य देण्यात यावे.

६.४ ज्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पाटबंधारे विभागाच्या प्रकल्पातून पाणी घेते त्या प्रकल्पास शासनामार्फत आठमाही पाणी पुरवठ्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने शक्यतो जलाशय हा पाण्याचा उद्‌भव घ्यावा. ज्या ठिकाणी अशा प्रकारे जलाशय हा उद्‌भव घेण्यापेक्षा फार मोठया लांबीची जलवाहिनी नव्याने टाकावी लागत असेल त्याकरिता प्रकरणांच्या गुणवत्तेनुसार पाटबंधारे विभागाच्या विचारविनिमयाने शासन निर्णय घेईल.

६.५ औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना उद्योग खात्याकडून परवानगी देताना पाणी पुरवठयाशी संबंधित कारखान्यांना पाटबंधारे विभागाची परवानगी न घेता मंजूरी दिली जाते. यापुढे अशा कारखान्यांना मंजूरी देतांना संबंधित विभागाने पाटबंधारे विभागाकडून पाणी पुरवठयाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

**७.० साठवण तलाव**

७.१ महाराष्ट्र राज्यात जलसंपत्ती ही दुर्मिळ आहे. त्यामुळे साठविलेल्या पाण्याचा काटेकोरपणे वापर करणे अपरिहार्य आहे. यादृष्टीने वहनव्यय हा कमीत कमी ठेवण्याचे प्रयत्न असतात. वहनव्यय कमी असावा म्हणून शासनाने पाटबंधारे प्रकल्पातून बिगर सिंचन प्रयोजनासाठी पाणी घेताना शक्यतो जलाशयातून घ्यावा व अपरिहार्य परिस्थितीत नदी व कालवे या उद्‌भवातून घ्यावा असे ठरविले आहे. जलाशयाव्यतिरिक्त उद्‌भव असल्यास पाणी वापरदार संस्थांनी संतुलन साठा निर्माण करावा असा शासनाने निर्णय घेतला आहे. ह्याप्रमाणे नदी उद्‌भव असल्यास ४ महिने गरजेएवढी साठवण क्षमता निर्माण करणे पाणी वापरदार संस्थेस बंधनकारक आहे. अशा साठवण क्षमतेमुळे पाणी पुरवठ्याची विश्वासार्हता वाढते.

७.२ तथापि नदी उद्‌भव धरून ग्रामीण व नागरी पाणीपुरवठा योजना आखल्या जातात व त्यासाठी साठवण क्षमता निर्माण करण्याची ४ महिन्याची अट शिथिल करण्याबाबत वारंवार मागणी लोकप्रतिनिधीव्दारे तसेच महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळाव्दारे केली जाते. तेव्हा ज्या प्रकरणी नदीचा कालव्याप्रमाणे बारमाही वापर होत असतो तो विचारात घेऊन तसेच उपसाबंदी कालावधी व विद्युत निर्मितीचा बंद कालावधी विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

७.३ साधारणतः नदीत ८ महिन्याचा कालावधी पर्यंत पाणी असू शकते अवर्षणसदृश्य परिस्थितीत पाणी उपलब्धतता ८ महिन्यापेक्षाही कमी असू शकते. त्यानुसार किमान ४ महिन्यांच्या गरजेएवढी किंवा नदीतील पाणी उपलब्धता विचारात घेऊन साठवण क्षमता निर्माण करण्याची अट बंधनकारक आहे. तथापि ज्या नदीत सिंचनासाठी बारमाही पाणी सोडले जाते त्या नदीवरील पिण्याच्या पाणी पुरवठा योजनेसाठी ४ महिन्याच्या साठवण क्षमतेची अट शिथिल करुन ती आता एक महिन्याचा करण्याचा निर्णय शासन घेत आहे. इतर नद्याबाबत मात्र ४ महिन्याच्या गरजेएवढी आवश्यक असणारी साठवण क्षमतेची अट कायम राहील.

७.३ काही नद्यांमध्ये जलाशयातून बारमाही पाणी सोडण्यात येत असले तरी पाणी उपलब्धता विचारात घेऊन सिंचनासाठी पाणी पुरविण्याच्या दोन आवर्तनामधील कालावधी एक महिन्यापेक्षा जास्त ठेवणे भाग पडते. अशा ठिकाणी पिण्यासाठी खास पाणी सोडावे लागल्यास वहनव्ययही मोठया प्रमाणात होतो. अशी परिस्थिती ज्या नद्यावर असेल त्या ठिकाणी बिगर सिंचन पाणी वापरासाठी (पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी) ४ महिन्याच्या साठवण क्षमतेची अट शिथिल न करण्याचा निर्णय शासन घेत आहे. याशिवाय ज्या नदीच्या खोऱ्यात पाणी उपलब्धतता मागणीहून कमी आहे व जेथे पिण्याच्या पाण्यासाठी खास आवर्तने देण्याची गरज पडते अशा नद्याबाबतही ४ महिन्याच्या गरजेएवढी आवश्यक असणारी साठवण क्षमतेची अट कायम ठेवण्यात येत आहे. यामुळे फक्त ज्या नदीत सिंचनासाठी एक महिन्यापेक्षा कमी अंतराने पाणी सोडण्यात येते आणि उपलब्धतता मागणीहून जास्त आहे अशा नद्यावरील योजनांसाठीच ४ महिन्याच्या साठवण क्षमतेची अट शिथिल करून १ महिन्याची करण्याचा शासन निर्णय कायम ठेवण्यात येत आहे.

## ८.० अंशदान मागणी व अग्रक्रम

धरणाच्या साठयामध्ये पिण्याच्या पाण्याचे आरक्षण वाढविण्याच्या बाबीचा सर्वंकष विचार करुन शासनाने पिण्याच्या पाण्याकरिता असा निर्णय घेतला आहे की, पाटबंधारे विभागामार्फत बांधल्या जाणाऱ्या नवीन धरणाच्या नियोजनामध्ये उपलब्ध जिवंत साठयामध्ये १५ टक्के पाणी पिण्यासाठी आरक्षित करावे.

८.१ बिगर सिंचन पाणी वापर संस्थेने धरणाचे जिवंत पाणी साठयाचे १५ टक्क्यांपेक्षा जादा एकंदर आरक्षण बिगर सिंचन पाणी पुरवठा योजनांकरिता मागितले तर अशा संस्थेने पाटबंधारे विभागाला त्या प्रमाणात अंशदान द्यावे लागेल.

८.२ पाटबंधारे विभागाच्या प्रचलित नियमानुसार बिगर सिंचन पाणीवापर संस्थेने पाटबंधारे विभागास वेळेवर पाणीपट्टीची रक्कम देणे आवश्यक आहे.

८.३ पाणी मंजूरीच्या वेळी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रकल्पीय पाणी साठयासाठी असलेल्या प्रचलित मापदंडानुसार पाणी आरक्षणाच्या प्रमाणात होणारी किंमत संबंधित पाणी वापरणाऱ्या संस्थेकडून प्रकल्पाच्या भांडवली खर्चाचा हिस्सा म्हणून करारनामा करण्यापूर्वी वसूल करण्यात यावी.

८.४ धरणाच्या पाण्याच्या वापराचा अग्रकम खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | पिण्याचे पाणी | १५ टक्के |
| २) | उद्योग | १० टक्के |
| ३) | सिंचन | उर्वरित |

## ९.० आकस्मिक पाणी पूरवठा समन्वय समिती व समितीची कार्यपध्दती

९.१ जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी विभागातील पिण्याच्या पाणी पुरवठा कार्यक्रमाचे समन्वय व संनियंत्रण करण्यासाठी खालीलप्रमाणे समन्वय समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संबांधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | संबांधित जिल्ह्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी | सह. अध्यक्ष |
| ३) | जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक | सदस्य |

४) जिल्ह्याच्या पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता सदस्य
५) संबंधित जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे कार्य. अभियंता सदस्य
६) संबांधित जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्य. अभियंता सदस्य
७) जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सदस्य
८) संबांधित जिल्ह्याचे जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी सदस्य

९.२ वरीलप्रमाणे समन्वय समितीची सभा महिन्यातून किमान एकदा एका विशिष्ट दिवशी घेण्यात यावी.

९.३ सदर समितीने जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागातील बृहत आराखड्याच्या आधारे तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्याप्रमाणे कार्यक्रमाची अंमलबजावणी व अंमलबजावणीतील त्रुटी शोधून काढून त्या वेळीच दूर कराव्यात. यासाठी कृती आराखड्यामध्ये अंतर्भूत असलेल्या उपाययोजनांची माहिती यंत्रणानिहाय सादर करून योजनेसाठी आवश्यक असणारे स्त्रोत अंतिम करणे व त्यादृष्टीने पाठपुरावा करणे, योजनांना प्रशासकीय मान्यता मंजूरी सक्षम प्राधिकाऱ्याकडून वेळीच मिळविणे, प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर तांत्रिक मंजूरी व निविदा काढण्याची कार्यवाही वेळीच होते की नाही याचा आढावा घेणे, जिल्ह्यातील ज्या योजना प्रगतीपथावर आहेत त्याचा आढावा घेऊन त्या विहित कालमर्यादेत पूर्ण होतील याबाबत आढावा घेणे, वेळोवेळी येणाऱ्या अडचणी (उदा.जमीन मिळविणे) सोडविणे, पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांना वीज जोडण्या मिळाव्यात यासाठी पूर्वतयारी करणे व वीज जोडण्या वेळेवर मिळतील याबाबत कार्यवाही करणे इत्यादी कामे करावीत.

**१०.० <u>उच्चाधिकार समिती व समितीची कार्यपध्दती</u>**

१०.१ पाटबंधारे विभागाच्या जलाशयातून पिण्यासहित सर्व प्रकारच्या बिगर सिंचनासाठी पाणी आरक्षण करण्याचे जे प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे प्राप्त होतात त्यातील ज्या प्रस्तावांतर्गत जलाशयातील उपयुक्त पाणीसाठ्याच्या २५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणी आरक्षित करण्याचे प्रस्ताव असतील त्या प्रस्तावांशी संबांधित विविध बाबींवर विचार करून निर्णय घेण्यासाठी खाली नमूद केलेले सदस्य असलेली मंत्रीमंडळाची एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात येत आहे. या समितीचे अध्यक्ष व इतर सदस्य खालीलप्रमाणे असतील.

१) मंत्री ( पा ) अध्यक्ष
२) मंत्री ( वित्त ) सदस्य
३) मंत्री ( पाणीपुरवठा व स्वच्छता ) सदस्य
४) मंत्री (उद्योग ) सदस्य
५) मंत्री ( कृषि ) सदस्य
६) राज्यमंत्री ( पाणीपुरवठा ) सदस्य

शासन असाही निर्णय घेत आहे की, अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव (पाटबंधारे/लाक्षेवि) पा.वि. हे मंत्रिमंडळाच्या उच्चाधिकार समितीच्या सभांना स्थायीरुपाने निमंत्रित असतील. बिगर सिंचनापैकी औद्योगिक किंवा अन्य कारणासाठी मागण्याचे प्रस्ताव विचारार्थ असतील त्यावेळी अध्यक्षांच्या सूचनेनुसार संबंधित अन्य सचिवांना निमंत्रित करण्यात येईल.

१०.२ समिती मंत्रीमंडळाच्या वतीने खालील बाबतीत निर्णय घेण्यास सक्षम राहील.

१) पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातून बिगर सिंचनासाठी मागणी केल्याप्रमाणे आरक्षण करावे किंवा कसे ?

२) हे आरक्षण टप्प्याटप्प्याने करावे किंवा कसे ?

३) सिंचन पुनर्स्थापित करण्यासाठी आवश्यक असणारी तरतूद पाटबंधारे विभागाच्या वार्षिक नियत तरतूदीच्या बाहेर वाढीव तरतूद म्हणून करावी लागेल. ही तरतूद लाभार्थी विभागाच्या तरतुदीमधून पाटबंधारे विभागाकडे वळती करण्यात यावी किंवा कसे ?

४) लाभार्थी विभागाकडून तरतूद वळती करता येत नसल्यास सिंचन पुनर्स्थापित करण्यासाठी अन्य कोणत्या मार्गाने वाढीव तरतूद उपलब्ध करुन देता येईल.

५) बिगर सिंचनासाठी पाणी पुरवठा विभाग आणि उद्योग विभाग यांच्याकडून २०३१ सालापर्यंतच्या दीर्घकालीन मागण्या प्राप्त झाल्या आहेत आणि ज्यामुळे सिंचनात घट होणार आहे. त्यासंबंधी सिंचन पुनर्स्थापित करण्यासंबंधीची दीर्घकालीन उपाययोजना व आर्थिक तरतूद इ. संबंधी कोणता धोरणात्मक निर्णय घ्यावा.

६) याखेरीज अशा प्रकारच्या मंजूरी देण्यामध्ये विशिष्ट परिस्थितीत अन्य काही प्रश्न असल्यास त्या बाबतचे निर्णय

## ११.० <u>क्षेत्रीय मुख्य अभियंताचे अधिकार</u>

११.१ पाटबंधारे विभागाकडील पूर्ण झालेल्या व बांधकामाधीन प्रकल्पाच्या प्रकल्पीय उपयुक्त साठयाच्या १५ टक्के पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षित करण्याचे अधिकार क्षेत्रीय मुख्य अभियंता यांना याव्दारे प्रदान करण्यात येत आहेत.

११.२ तसेच प्रकल्पाच्या उपयुक्त साठ्याच्या १५ टक्क्यांपर्यंतचे पाणी आरक्षणासाठी यापुढे धरणाचा प्रमाणशीर खर्च संबंधित विभागाने/संस्थेने देण्याची आवश्यकता नाही.

११.३ बिगर सिंचनाचे पाण्यासाठी आरक्षण हे एकत्रितपणे होणारे एकूण आरक्षण (वहन, बाप्पीभवन व इतर तूट धरुन) १५ टक्क्यांपर्यंत असेल तर सदर आरक्षणास क्षेत्रीय मुख्य अभियंता यांनी प्रचलित नियमांचे अधिन राहून मंजूरी द्यावी. जर एकूण बिगर सिंचनासाठीचे आरक्षण १५ टक्क्यांपेक्षा जास्त होत असेल तर तसे प्रस्ताव शासनाकडे पाठवावे.

११.४ पाटबंधारे विभागाच्या प्रचलित नियमानुसार संबंधित संस्थांनी पाटबंधारे विभागास वेळेवर पाणीपट्टीची रक्कम देणे आवश्यक आहे.

११.५ बिगर सिंचनसाठीच्या पाणी पुरवठा योजनांचे उद्‌भव जर अधिसूचित नदी दर्शविली असेल तर त्या नदीमध्ये उद्‌भवाच्या ठिकाणी बारमाही पाणी उपलब्ध होत असल्याची खात्री करून त्या पाणी पुरवठा योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार क्षेत्रिय मुख्य अभियंता यांना याव्दारे प्रदान करण्यात येत आहेत.

## १२.० पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयात पाणी राखून ठेवणेबाबत समिती

अवर्षण वर्षात ज्या ठिकाणी पाणी पुरवठयाचा स्थानिक उद्‌भव संपूर्णपणे खर्ची पडला आहे त्यासाठी जवळच्या जलाशयातून पाणी आणणे आवश्यक आहे अशा ठिकाणी पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी राखून ठेवावयाच्या पाणी पुरवठयाचा साठा खालील बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावा.

१२.१ प्रत्येक माणशी प्रतिदिनी ४० लिटर याप्रमाणे दुर्भिक्षपीडित लोकसंख्येस ३० जूनपर्यंत लागणाऱ्या पाण्याचा हिशोब करावा. सदर दुर्भिक्षपीडित लोकसंख्या व तिची पिण्याच्या पाण्याची गरज ठरविताना स्थानिक विहिरी व तळी यातून मिळू शकणाऱ्या पाण्याचा पुरवठाही लक्षात घ्यावा. प्रकल्पाच्या जलनियोजनात ज्या ठिकाणी जलाशयातून नदीत पाणी सोडण्याची तरतूद आहे अशा प्रकल्पांव्यतिरिक्त इतर प्रकल्पांमध्ये वरीलप्रमाणे राखून ठेवावयाचे पाणी जलाशयातच राखून ठेवावे व जलाशयातूनच उचलून घ्यावे. हे करताना अर्थातच ऑक्टोबरनंतरही जे पाणी या तलावातून येण्याचा अंदाज असेल त्यावरही उपलब्ध पाणी म्हणून विचार व्हावा. वरीलप्रमाणे राखून ठेवावयाचा साठा जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने निश्चित करावा. या समितीचे सभासद पुढीलप्रमाणे राहतील.

१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य

३) सिंचन व्यवस्थापनाशी संबंधित कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग - सदस्य

४) जिल्हयातील परिसर अभियांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता - सदस्य (ग्रामीण पाणी पुरवठयाशी संबंधित)

जिल्हयात परिसर अभियांत्रिकी अभियंते एकापेक्षा अधिक असल्यास ग्रामीण पाणी पुरवठयाशी संबंधित कार्यकारी अभियंता हे या समितीचे सदस्य राहतील.

या समितीने दरवर्षी १ ते १५ ऑक्टोबरदरम्यान बैठक घ्यावी व पुढील जूनअखेरपर्यंत पिण्याकरिता राखून ठेवण्याचा पाण्याचा साठा ठरवावा. म्हणजे निरनिराळया प्रकल्पातील सिंचन कार्यक्रमाचे नियोजन करणे सुलभ होईल.

एखादेवेळी पिण्याचे पाणी राखून ठेवणेबाबत एकमत झाले नाही तर संबंधित आयुक्त, महसूल विभाग यांचेकडे समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तासह संदर्भ करावा. या प्रकरणी आयुक्तांनी सिंचन व्यवस्थापनाशी संबंधित अधीक्षक अभियंता यांच्या सल्ल्याने निर्णय घ्यावा.

सदर समितीने अशा प्रकारचे पिण्याचे पाणी पुरवठयाशी राखून ठेवण्याच्या साठयाबाबत १५ ऑक्टोबरपूर्वी निर्णय घेतल्यानंतर जे पाणी राखून ठेवावयाचे नसेल तर त्याचा सिंचनासाठी व इतर अनुज्ञेय कारणाकरिता पूर्णपणे वापर करता येईल. कारण पुढील जूनअखेर वापरता येईल अशा पाण्याची निश्चिती हंगामापूर्वी होणे सिंचन नियोजनाचे दृष्टीने तसेच पिण्याच्या पाण्याच्या नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून उपलब्ध पाण्याचा चांगल्या प्रकारे वापर होण्याचे दृष्टीने हे वेळापत्रक काटेकोरपणे पाळावे.

पाणी राखून ठेवण्यासाठी त्या शहराच्या नगरपालिकेने किंवा जिल्हा परिषद अभियांत्रिकी मंडळ यांनी पाटबंधारे विभागाकडे पाणीपट्टीची ५० टक्के रक्कम आगाऊ भरावी. उर्वरित मार्चअखेर वापरलेल्या पाण्याची पाणीपट्टीची रक्कम स्वतंत्रपणे एप्रिलमध्ये व त्यानंतर जूनपर्यंत वापरलेल्या पाण्याची पाणीपट्टीची रक्कम जुलैमध्ये पूर्णपणे भरावी. यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांनी सदर रकमेचा विहित वेळेवर पाटबंधारे विभागाकडे भरणा करण्याबाबत विशेष लक्ष द्यावे. अन्यथा त्यांची जबाबदारी राहील.

**१३.० बिगर सिंचन पाणी पुरवठयासाठी करावयाचा करारनामा**

पाटबंधारे विभागाकडून पाणी परवानगी मिळाल्यावर पाणी वापरणारी संस्था/यंत्रणा यांनी पाटबंधारे विभागाच्या संबंधित कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधून विहित नमुन्यात करारनामा करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पाणीपुरवठा सुरु करण्यात येणार नाही. असा करारनामा करताना संबंधित संस्था/यंत्रणेला त्यांच्या संभाव्य पाणी वापराच्या २

महिन्याच्या आकारणीइतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून पाटबंधारे विभागाकडे धनादेशाने किंवा रोखीने अदा करावी लागेल, ही रक्कम पाटबंधारे विभागाकडे बिनव्याजी जमा राहील. हयाबाबत शासन परिपत्रक क्र. बिपापु १००१/(७१३/२००१)/सिंव्य(धो.), दि. १८.९.२००२ अन्वये दिलेल्या सविस्तर सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

करारनामा न करता पाणीपुरवठा केल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

**सहपत्र**

१) अनुसूची (अ)

२) छाननी यादी व २६ स्तंभी तक्ता

**३)** २६ स्तंभी तक्ता

**( प्र.रा.भामरे )**
**शासनाचे उप सचिव**

प्रत -

स्वीय सहाय्यक सचिव (पाटबंधारे), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहाय्यक सचिव लाक्षेवि), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यकारी संचालक, सर्व पाटबंधारे विकास महामंडळे
महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
महासंचालक, महाराष्ट्र जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद
मुख्य अभियंता व प्राचार्य, अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक
मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक
मुख्य अभियंता, ल.पा.(स्था.स्तर), पुणे
सर्व विभागीय आयुक्त (महसूल विभाग)
सर्व मुख्य अभियंते व सह सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व क्षेत्रीय मुख्य अभियंते, पाटबंधारे विभाग
सर्व जिल्हाधिकारी
मंत्रालयीन तांत्रिक उप सचिव/अवर सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय
सर्व क्षेत्रीय अधीक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग,
सर्व तांत्रिक कार्यासने, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई
सिं.व्य.(धो.) कार्यासन संग्रहार्थ

**प्रपत्र - "अ"**

**विषय : बिगर सिंचनासाठी पाणीपुरवठा ( पिण्यासाठी / औद्योगिक )**

## शासन निर्णय सूची

| | |
|---|---|
| १) | शासन निर्णय क्र. (इंग्रजी) एमआयसी १०६२ आय(५), दिनांक १५.१२.१९६५ |
| २) | शासन (इंग्रजी) पत्र क्र. बीकेएस २७६४/१११०८५ आय(४), दिनांक २१.२.१९६६ |
| ३) | शासन ज्ञापन (इंग्रजी) पत्र क्र.बीकेएस २७६४/१११०८५ आय (४), दिनांक १८.३.१९६६ |
| ४) | शासन ज्ञापन (इंग्रजी) पत्र क्र.बीकेएस २७६४/१११०८५ आय (४), दिनांक २५.६.१९६६ |
| ५) | शासन (इंग्रजी) पत्र क्र. बीकेएस २७६८/४८६३३/आय (४), दिनांक २.९.१९६६ |
| ६) | शासन ज्ञापन (इंग्रजी)आय ॲडपीडी क्र. बीकेएस २७६६/११९०३ आय (४),दिनांक ६.११.१९६७ |
| ७) | शासन (इंग्रजी) पत्र क्र. बीकेएस १६६८/१३५२४५/आय (४), दिनांक ११.६.६९ |
| ८) | शासन परिपत्रक (इंग्रजी) क्र. डब्ल्युएसटी/३५६७/३३५८५ पीच एच (आय), दिनांक ६.१.१९७१ |
| ९) | शासन परिपत्रक बीकेएस १०७०/१३०८२ पा (४), दिनांक ४.५.१९७१ |
| १०) | शासन परिपत्रक (इंग्रजी) क्र. डब्ल्युएसटी १०७४ पीएच(३), दिनांक २३.१२.१९७४ |
| ११) | शासन (इंग्रजी) पत्र क्र. बीकेएस २७२६/११९९०३ आय (४), दिनांक २४/३/१९७५ |
| १२) | शासन निर्णय (इंग्रजी) क्र. बीकेएस २७७४/१४९७८ पा (४), दिनांक ३१/३/१९७५ |
| १३) | शासन (शुध्दीपत्र) क्र. बीकेएस २७७४/१४९७८ टी (१४), दिनांक २/८/१९७५ |
| १४) | शासन (इंग्रजी) पत्र क्र. बीकेएस २७७५/४४२२५ टी (१३), दिनांक २६/७/१९७६ |
| १५) | शासन निर्णय (इंग्रजी) क्र. बीकेएस २७७४/५४८ व्यवस्था (१), दिनांक २९/१०/१९७९ |
| १६) | शासन निर्णय क्र. बीकेएस १०८३/२५२६/सिं.व्य (प्र), दि.१०.३.१९८३ |
| १७) | शासन परिपत्रक क्र.एमआयएस १०८३/२२५१/सिं.(जनि), दि.१७.६.८३ |
| १८) | शासन (इंग्रजी) परिपत्रक क्र.एमआयएस १०८३/(७४/८३) डब्ल्युआरआय (१) , दि.३.८.८३ |
| १९) | शासन पत्र क्र. बीकेएस १०८३/३१५८ सिं.(प्र), दि.१५.९.८३ |
| २०) | शासन परिपत्रक क्र.एम-९५/१६१३ (४०५४) पा.प्र. (१), दि.१८.१२.८४ |
| २१) | शासन निर्णय क्र. बीकेएस १०७१/३८ सिं (व्य), दि.४.३.८५ |
| २२) | शासन परिपत्रक क्र. बीकेएस १०८४/८६३ सिं (प्र), दि.१६.२.८५ |
| २३) | शासन पत्र क्र. एस -९५/२६/(३४१/८५)/सिं.(म.), दि. ५.९.१९८५ |
| २४) | शासन परिपत्रक क्र.बीकेएस १०८६/११/८६ सिं.व्य. शिकाव्य, दि.४.१२.८६ |
| २५) | शासन निर्णय क्र.पीपापू १०८६/६६१ सिं.(व्य.), दि.५.१.८७ |
| २६) | शासन परिपत्रक क्र. बीकेएस १०८६/९३९ सिं.व्य., दि.२.९.८७ |
| २७) | शासन परिपत्रक क्र. बीकेएस १०८७/११५२ सिं.(व्य.), दि.११.१२.८७ |
| २८) | शासन पत्र क्र. बीकेएस १०८७/९९२/सिंव्य((धो.), दि. २.२.१९८८ |
| २९) | शासन निर्णय क्र. संकीर्ण १०८७/सिं.व्य., दि.३.६.८८ |
| ३०) | शासन निर्णय क्र. बीकेएस १०८८/४३ सिं.(व्य.), दि.१०.५.८८ |
| ३१) | शासन परिपत्रक क्र.औपापू १०८८/९२४ सिं.व्य. (धो), दि.१२.२.९० |
| ३२) | शासन पत्र क्र. औपापु १०८६/७६१/सिं.व्य.(धो.), दि. २७.१२.१९९० |
| ३३) | शासनपत्र क्र. बीकेएस १०८७/११५२/सिं.व्य.(धो.), दि. १६.३.१९९१ |
| ३४) | शासन परिपत्रक शुध्दिपत्रक क्र. बीकेएस १०८७/११५२ सिं.व्य. (धो), दि.२९.७.९२ |

| | |
|---|---|
| ३५) | शासन निर्णय क्र. पीपापू/१०९२/३३५ सिं.व्य. (धो), दि. १५.९.९२ |
| ३६) | शासन निर्णय क्र. पीपापू/१०९२/३३५ सिं.व्य. (धो), दि.४.३.९३ |
| ३७) | शासन पत्र क्र. औपापु १०८६/७६१/सिं.व्य.(धो.), दि. १६.७.१९९३ |
| ३८) | शासनपत्र क्र. पिपापु/१०९३/४३०/सिं.व्य.(धो), दि. १.१२.१९९३ |
| ३९) | शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०९६/३९८ सिं.व्य. (धो), दि.६.५.९७ |
| ४०) | शासन निर्णय क्र. बैठक १०९६/८६१(१८८/९६) जसांनि, दि.३०.७.९७ |
| ४१) | शासन निर्णय क्र. संकीर्ण १०९७/२९१ सिं.व्य. (धो), दि.२०.१०.९७ |
| ४२) | शासन निर्णय (पा.पु. व स्व.वि.) क्र. संकीर्ण १०९७/प्र.क्र.११८/पापू ०७, दि.१०.१२.९७ |
| ४३) | शासनपत्र क्र. संकीर्ण १०९७/११५२/सिं.व्य.(धो.), दि. १०.१२.१९९७ |
| ४४) | शासन निर्णय क्र. संकीर्ण १०९८/२२ सिं.व्य. (धो), दि.२३.२.९८ |
| ४५) | शासन निर्णय क्र. संकीर्ण १०९८/१० सिं.व्य. (धो), दि.२३.२.९८ |
| ४६) | शासन परिपत्रक क्र. बैठक १०९६/८६१/(१८८/९६) जसांवि, दि.१२.३.९८ |
| ४७) | शासन निर्णय क्र. संकीर्ण १०९७/३७६ सिं.व्य. (धो), दि.२१.४.९८ |
| ४८) | शासन निर्णय क्र.संकीर्ण १०९८/७९ सिं.व्य. (धो), दि.३०.५.९८ |
| ४९) | शासन परिपत्रक क्र.बीकेएस १०९८/१६१ सिं.व्य. (धो), दि.१४.१०.९८ |
| ५०) | शासन निर्णय क्र. संकीर्ण १०९९/२२०/९९/सिं.व्य.(धो), दि. ३०.११.१९९९ |

## छाननी यादी

**विषय : पाटबंधारे प्रकल्पातून पिण्यासाठी /औद्योगिक वापरासाठी पाणी पुरवठा योजनांच्या मंजूरीचा प्रस्ताव पाठवितांना सादर करावयाची छाननी यादी.**

१) पाणी पुरवठा योजनेचे नांव
(ठिकाण / तालुका / जिल्हा)
अ) योजनेचे बांधकाम सुरु होण्याचे वर्ष
ब) योजना कार्यान्वित होण्याचे वर्ष

२) अ) उद्‌भवाचे ठिकाण व जलाशयाचे किंवा नदीचे नांव.
ब) सदर उद्‌भव पाणी टंचाई खोऱ्यातील आहे काय ?
क) असल्यास कोणत्या खोऱ्यातील?

३) पाणीपुरवठयाचा लाभ मिळणारे कारखाने, गांवे व त्यांची लोकसंख्या
वर्ष २०११
वर्ष २०२१
वर्ष २०३१ अखेर

४) पाणीपुरवठयाचा उद्‌भव
जलाशयातून पाणी उचलून थेट नळाव्दारे पुरविणे अनिवार्य आहे काय ?
योजनेच्या नियोजनात अशी तरतूद आहे काय ?
अ) पाटबंधारे प्रकल्पाचे नांव व संकल्पित जलनिष्पत्तीची टक्केवारी
ब) योजनेचे ठिकाण
१) जलाशयातून
२) कालव्यातून
३) जलाशयाच्या वरील नदीपात्रातून
४) धरण ते उन्नेयी बंधारा यामधील नदीपात्रातून
५) उन्नेयी बंधाऱ्याखालील बाजूस नदीपात्रातून

५) प्रकल्पस्थळी उपलब्ध जलनिष्पत्ती (दलघमी) ५० टक्के ७५ टक्के ९५ टक्के

६) पाण्याची उपलब्धता
अ) प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा (दलघमी)
ब) सिंचनासाठीची प्रकल्पातील अहवालातील तरतूद (दलघमी)
क) बिगर सिंचनासाठी प्रकल्पअहवालातील तरतूद (दलघमी)
ड) या प्रस्तावापूर्वी बिगर सिंचनासाठीचा एकूण मंजूर पाणीसाठा
(प्रकल्पीय तरतूदीव्यतिरिक्त शासकीय मंजूरीनुसार)
१) पिण्यासाठी (निव्वळ वापर + तूट) (दलघमी)
२) औद्योगिक वापरासाठी (निव्वळ वापर + तूट) (दलघमी)
इ) प्रस्तुत प्रस्तावाची मागणी
(निव्वळ वापर + तूट) (दलघमी) वर्ष २०११ पर्यंत वर्ष २०२१ पर्यंत वर्ष २०३१ पर्यंत

ई) एकूण बिगर सिंचनासाठी वर्ग होणारा पाणीसाठा (निव्वळ वापर + तूट) (दलघमी)
व त्याची प्रकल्पीय उपयुक्त साठयाशी टक्केवारी

फ) सिंचनासाठी आता उपलब्ध होणारा पाणीसाठा (दलघमी) (६ ब - ६ ई)

७) पाणी मागणीपेक्षा, प्रकल्पस्थळी ९५ टक्के विश्वासार्हतेस उपलब्ध पाणी
पाणी कमी असल्यास पर्यायी उद्‌भव कोणता व या उद्‌भवास

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची /औद्योगिक विकास केंद्राची सहमती आहे काय ?

८) प्रत्यक्ष मंजूरी व वापर

| | मंजूरी (दलघमी) | वापर / टक्के |
|---|---|---|
| अ) पिण्यासाठी | --- | --- |
| ब) औद्योगिक वापर | --- | --- |
| क) सिंचनासाठी वापर | --- | --- |
| | एकूण | |

९) प्रस्तावित मंजूरीसाठी उपलब्धता (दलघमी)
(टीप : सर्व विचाराधीन योजनांची पाणीपुरवठयाची मागणी दाखविणारा स्वतंत्र तक्ता जोडावा.)

१०) सिंचन क्षेत्रातील कपात

| | |
|---|---|
| अ) प्रकल्पीय सिंचन क्षमता | हेक्टर |
| ब) आजपावेतो बिगर सिंचन पाणीवापर मंजूरीवरील कपात | हेक्टर |
| क) प्रस्तावित मागणीमुळे वर्ष २०११ पर्यतच्या मागणीनुसार होणारी कपात (६इ पोटी) | हेक्टर |
| ड) सिंचन क्षमतेत होणारी एकूण कपात (वरील ६ई पोटी) | हेक्टर |
| इ) आता उपलब्ध होणारी उर्वरित सिंचन क्षमता (१० अ - १० ड) | हेक्टर |

११) वरील सिंचन कपात सिंचन क्षेत्राच्या १० टक्के पेक्षा जास्त होत आहे काय?
असल्यास किती टक्के ?

१२) सिंचन क्षेत्रात १० टक्क्यापेक्षा जास्त कपात करणे आवश्यक असल्यास इतर (कार्यान्वित अथवा प्रस्तावित प्रकल्प) पर्यायी उदभव शक्य आहे का ?

१३) वरील सिंचन कपात प्रकल्पाच्या नूतनीकरणाव्दारे पुनर्स्थापित करण्यासाठी रु.५०,००० प्रति हेक्टर प्रमाणे येणारा खर्च लक्ष रुपये

१४) नूतनीकरणाचे काम विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी वर्षनिहाय लागणारा निधी लक्ष रुपये

१५) जलाशयाऐवजी कालवा उदभव धरल्यास कालवा हा उद्‌भव म्हणून टाळता येणार नाही का? याचे संयुक्तिक कारण

१६) कालवा उद्‌भव अपरिहार्य असल्यास ३० दिवस पुरेल एवढा पाणीसाठा करण्यासाठी बारमाही कालव्यावर व ५ महिन्याचा साठा करण्यासाठी आठमाही कालव्यावर संस्थेने त्यांच्या नियोजनात (पूरक तलाव) उपाययोजना अंतर्भूत केलेली आहे काय ?

१७) नदी उद्‌भव असल्यास जलाशयातून नदीपात्रात पाणी सोडले जाणार नाही ही जाणीव संबधितांना लेखी दिली आहे काय ?

१८) पिण्यासाठी अगर औद्योगिक वापरासाठी मोठया प्रमाणात (१५ टक्क्यांपेक्षा जास्त) पाणीवापर होणार असल्यास प्रकल्पीय पाणी साठयाच्या पाणीवापराचे प्रमाणात धरणाचा खर्च देण्याचे ठरल्यास संस्थेने किती रक्कम देणे जरूर आहे ?

संबंधित संस्था रक्कम भरण्यास तयार आहे काय ?

१९) वरील यादीतील उल्लेख नसलेली परंतु विशिष्ट योजनेच्या संदर्भात आवश्यक असलेली माहिती.

२०) योजना मंजूरीबाबत व्यवहार्य बाजू व योजना कार्यान्वित करताना येणाऱ्या संभाव्य अडचणी लक्षात घेऊन मुख्य अभियंता यांचे सुस्पष्ट अभिप्राय असावेत.

२१) प्रस्तावासोबत संपूर्ण माहिती देणारा दर्शक नकाशा जोडला आहे काय? (योजनेचे ठिकाण पाटबंधारे प्रकल्प व योजनेचे उद्‌भव स्थान वगैरे)

२६ स्तंभी तक्ता (पान क्र. १)

## पिण्यासाठी पाणी आरक्षित करण्यासंबंधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेला प्रस्तावांचा गोषवारा

| अ. क्र. | पाणी पुरवठयाच्या योजनेचे नांव | तालुका व जिल्हा | पाण्याची मागणी (द.ल. घ.मी.) | | | पायाभूत लोकसंख्या | | | दरडोई दर दिवशीच्या पाण्याचे प्रमाण (लिटर्स) | प्रस्तावित उद्भव (प्रकल्पाचे नांव) | उद्भवातून पाणी कसे घेणार जलाशयातून की कालव्यातून | उद्भवाच्या ठिकाणी वेगवेगळया विश्वासार्हतेला उपलब्ध असलेले पाणी (दलघमी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०११ पर्यंत | २०२१ पर्यंत | २०३१ पर्यंत | २०११ पर्यंत | २०२१ पर्यंत | २०३१ पर्यंत | | | | ५० टक्के | ७५ टक्के | ९५ टक्के |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

प्रपत्रातील उर्वरित स्तंभ पुढील पानावर ....

२६ स्तंभी तक्ता (पान क्र. २)

## पिण्यासाठी पाणी आरक्षित करण्यासंबंधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेला प्रस्तावांचा गोषवारा

| प्रत्यक्ष मागणी व ९५ टक्के विश्वासार्हतेने उपलब्ध पाणी यांचे गुणोत्तराची टक्केवारी (स्तंभ ४ + स्तंभ २०) x १०० / स्तंभ १५ | धरणातील उपयुक्त पाणी साठा (द.ल.घ.मी.) | प्रत्यक्ष मागणी व उपयुक्त पाणी साठा यांचे गुणोत्तराची टक्केवारी (स्तंभ ४ + स्तंभ २०) x १०० / स्तंभ १७ | प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) | यापूर्वी पाणी आरक्षित केल्यामुळे आतापर्यंतचे बिगर सिंचनसाठीचे आरक्षण (द.ल.घ.मी.) | त्यामुळे कमी झालेली सिंचन क्षमता (हेक्टर) | आताची कमी होणारी सिंचन क्षमता (हेक्टर) | एकूण कमी होणारी सिंचन क्षमता (हेक्टर) | कमी होणाऱ्या सिंचन क्षमतेची प्रकल्पिय सिंचन क्षमतेशी टक्केवारी स्तंभ २३ x १०० / स्तंभ १९ | रु. ५०,००० प्रति हेक्टर या प्रमाणे सिंचन क्षमता पुर्नस्थापित करण्यासाठी लागणारा खर्च ---- लक्ष रु. स्तंभ २२x०.५० | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

**तळ टीपा -** १) रकाना १६ मधील गुणोत्तर १ पेक्षा जास्त असेल तर पर्यायी उद्‌भव तपासावा व उपलब्ध असल्यास रकाना २६ मध्ये नमूद करावा.

२) पाण्याची एकूणच उपलब्धता कमी असेल तर मांजरा खो-याप्रमाणे दरडोई पाणी वापराचे निकष कमी करावेत.